# प्रकरण पहिले

# मराठी कादंबरी उदय आणि विकास

# प्रकरण पहिले

## मराठी कादंबरी उदय आणि विकास

### मराठी कादंबरीची पूर्वपीठिका

मराठी वाचक-लेखकांना कादंबरीच्या अस्तित्वाची जाणीव झाली. ती इ.स. १८१८ नंतर म्हणजे पेशवाई जाऊन इंग्रजांची राजवट आल्यानंतर या कालखंडात पाश्चात्य वाङ्मयाच्या परिचयाने आणि परिशीलनाने आपल्या देशातील लोकांना नव्या जुन्या अशा सर्वच वाङ्मयप्रकारांच्या संदर्भात एक नवी जाग आणि जाण आली. कादंबरी हा साहित्यप्रकार पूर्णपणे नवा होता, तरी त्याच्या काव्यात्म रूपामुळे इकडेही तो लवकरच लोकप्रिय झाला. एवढेच नव्हे, तर पाश्चात्य कादंबरीच्या धर्तीवर मराठी कादंबरीच्या निर्मितीचे प्रयत्न हळूहळू मूळ धरू लागले. या काळातील एकूण वातावरण, कादंबरीच्या विकासाच्या दृष्टीने अनुकूल-प्रतिकूल अशा संमिश्र स्वरूपाचे होते. मुद्रणाची सोय उपलब्ध होती. मराठी गद्याचे अभिव्यक्तीसामर्थ्य दिवसेंदिवस वाढत होते. शिक्षणाच्या प्रसारामुळे वाचकांची संख्याही वृद्धिंगत होत होती. वाचनाची गोडी लागावी म्हणून शिक्षणक्रमात काव्यात्म वाङ्मयाचा मुद्दाम अंतर्भाव केला जात होता. शिक्षण खातेदेखील काव्यात्म वाङ्मयाच्या अनुवादित, रूपांतरित आणि स्वतंत्र निर्मितीला प्रोत्साहन देत होते.

मराठी साहित्यातील एक समृध्द दालन म्हणजे मराठी कादंबरीचे विश्व होय. अखिल भारतीय पातळीवर मराठी व बंगाली साहित्य हे समृध्द मानले जाते. अनेक लेखकांनी विविध विषय हाताळलेले आहेत. तत्कालीन समाजजीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा यशस्वी प्रयत्न अनेक लेखकांनी केला आहे. सामाजिक आणि राजकीय पातळीवर ज्या घडामोडी झाल्या त्याचे चित्रणही आपणास मराठी कादंबरीच्या अंतरंगात पहावयास मिळते. अद्‌भुत कादंबऱ्या, सामाजिक समस्या हाताळणाऱ्या कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या, राजकीय प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या कादंबऱ्या, ग्रामीण जीवन रेखाटणाऱ्या कादंबऱ्या, कौटुंबिक समस्यांचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या, चरित्रात्मक कादंबऱ्या अशा अनेक

पदरांनी युक्त असलेले 'मराठी कादंबरी विश्व' मनाला भुरळ घालते.

कादंबरी हा वाङ्मयप्रकारच असा आहे की, ज्याचा अनेक दिशांनी अभ्यास करता येतो. मात्र नेमक्या दिशेने प्रवास केल्यास तिचे मर्म अचूकपणे आपल्या हाती लागेल. याचा नि:संदिग्ध उलगडा म्हणावा तशा प्रकारे झाला नाही. कारण आकलनाच्या संदर्भात अभ्यासकांना आव्हान देण्याचे फार मोठे सामर्थ्य या वाङ्मयप्रकारात दडलेले आहे. कादंबरीत समाविष्ट असलेल्या घटकांची बीजे प्राचीन काळातील देशोदेशीच्या कादंबरीसदृश्य लेखनात सापडत असली तरी एक वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीने धारण केलेला रूपबंध ही बाब आर्वाचीन आहे. यासंदर्भात मीनाक्षी मुखर्जी लिहितात ''एकोणिसाव्या शतकातील युरोपमध्ये कादंबरी ह्या वाङ्मयप्रकाराने आपले स्पष्ट स्वतंत्र, व्यक्तिमत्त्व धारण केले. तेव्हा त्याचा घाट हा आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या महाकाव्य, अद्‌भूत कथा व वीर कथा (saga) या कथनप्रकारांच्या संरचनापेक्षा निश्चितपणे भिन्न होता.''[१]

कादंबऱ्यांचा विशेष उल्लेख करताना ''बाणभट्टाची 'कादंबरी' किंवा सुबन्धूची 'वासवदत्ता' यांचा मात्र येथे विशेष उल्लेख केला पाहिजे. कारण आजच्या कादंबरी वाङ्मयप्रकाराचे जे विशिष्ट तंत्र जरी या कादंबऱ्यांमध्ये आढळले नसले तरी कादंबरी लेखनामागचे पहिले प्रयत्न या दृष्टिकोनातून या कादंबऱ्यांचे कादंबरीच्या विकासात महत्त्वाचे स्थान आहे. या कादंबऱ्यांमधील प्रणयप्रधान, चित्ताकर्षक, कथानक व ललितमधुर भाषाशैली हे यामधील गुण वाखाणण्यासारखे आहेत. यापैकी पहिल्या ग्रंथाचे विशेषनाम हे या प्रकारचे जातीवाचक सामान्यनाम झाले, यातच बाणाच्या कादंबरीचे महत्त्व व्यक्त झाले असून यात या ग्रंथाचा योग्य तोच गौरव झाला असे म्हणावयास हरकत नाही.''[२]

हिंदुस्थानातील प्राचीन काळातील वरील दोनच कादंबऱ्या उपलब्ध असून याशिवाय दुसऱ्या काही लिहिल्या गेल्या असल्या तरी त्या काळाच्या पडद्याआड लुप्त झाल्या आहेत. एकूणच अर्वाचीन कादंबरी युरोपात उगम पावली हे नाकारता येणार नाही. कादंबरी हा

वाङ्मयप्रकार कथात्मक वाङ्मयामध्ये मोडणारा असल्यामुळे कथात्मक वाङ्मयाच्या या परंपरेशी असलेले त्याचे नाते पूर्णतया तुटलेले नाही. अनेक शतकांची परंपरा असलेल्या कथात्मक वाङ्मयाच्या या परंपरेकडून कादंबरीने जे स्वीकारलेले आहे आणि नव्या जाणिवांपोटी जे नव्याने निर्माण केलेले आहे त्यातून तिचे रूप घडत गेलेले आहे. कादंबरी वाङ्मयासाठी वापरल्या जाणाऱ्या NOVEL या शब्दाची उत्पत्ती Novella या इटालियन शब्दात असून त्यापूर्वी तो बोकॅशिओच्या डिकॅमेरॉनमधील कथांसाठी (चौदावे शतक) वापरला जात असे. या शब्दाला अशी पूर्वपीठिका असली तरीही एक वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीचा उदय अठराव्या शतकात झाला ही वस्तुस्थिती आहे. पंधराव्या शतकात लिहिल्या गेलेल्या मॉर्ते डी आर्थर या गोष्टीरूप पुस्तकात कादंबरीची बीजे शोधण्याचा प्रयत्न झालेला आहे. परंतु तो पुरेसा समाधानकारक नाही. मात्र, कादंबरीचा मूलस्त्रोत सोळाव्या शतकात Romance या नावाखाली लिहिल्या गेलेल्या वीरकथांमध्येही शोधता येतो. यामध्ये मध्ययुगातील योध्द्यांच्या वीरकथा सांगितल्या जात. या वीरकथांना रोमान्स म्हणत असत. त्याच सुमारास इंग्लंडमध्ये 'टेल' नावाने काही कहाण्या प्रचलित होत्या. त्या कहाण्यांमधून इतिहासातील रोमन आणि सॅक्शन यांच्यातील संघर्षाच्या कथा सांगितल्या जात. अकराव्या शतकात फ्रेंच भाषेतील रोमान्स इंग्रजीत अनुवादित होऊ लागले आणि अशा पध्दतीने इंग्रज लेखकांनी आपल्या ऐतिहासिक कथांना इतिहासाच्या चौकटीतून मुक्त केले. पुढे देशभक्तीच्या भावनेतून राजा ऑर्थरचा इतिहास लिहिला गेला. या पध्दतीच्या आदर्शपूजक आणि बोधपर वीरकथांमध्ये भारतातून गेलेल्या लोककथाही मिसळल्या गेल्या आहेत. सर्वसाधारण जीवनचरित्रातून सत्य आणि सौंदर्याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करणे हे नॉव्हेलचे वैशिष्ट्य समजले जात असे. राणी एलिझाबेथच्या काळात अशा अनेक रोमान्स कथा लिहिल्या गेल्या. त्यांना Chivalry Romance असेही म्हटले जाते. अभ्यासकांनी आपले लक्ष, मुख्यत्वे ज्या प्रकारच्या कादंबरीवर केंद्रित केलेले आहे. त्यातून तिचे रूप घडत

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

गेलेले आहे. ती कादंबरी वास्तववादी प्रवृत्तीची कादंबरी आहे. त्यामुळे कादंबरी म्हणजे वास्तववादी प्रवृत्तीची कादंबरी असे समीकरण रूढ झालेले आहे. परंतु कादंबरी वाङ्मयाच्या अफाट पसाऱ्यातील बहुसंख्य कादंबऱ्या संपूर्णतया वास्तववादी प्रवृत्तीच्या निदर्शक नाहीत. म्हणजे वास्तववादी पध्दतीच्या या कादंबरीचे गुणधर्म त्यांच्यात साकल्याने आढळत नाहीत. मानवी जीवनव्यवहारांचे दर्शन घडविणे हा त्यांचा निर्मितीमागील प्रधान हेतू नसतो, तर सर्वसामान्य वाचकांच्या रंजनाचे एक साधन या दृष्टीने 'कादंबरी' ची निर्मिती करण्यात येते. त्यामुळे रंजक वाङ्मयाच्या निर्मितीमागील प्रेरणा आणि या कादंबरीच्या निर्मितीमधील प्रेरणा यात फरक नसतो. माणसाच्या स्वभावधर्माची काही वैशिष्टये आणि त्याच्या काही गरजा हेरूनच कोणत्याही कालखंडातील रंजनपर वाङ्मयाच्या निर्मितीचे आडाखे बांधलेले असतात. त्याच्या स्वभावधर्माची ही वैशिष्टये आणि त्याच्या या गरजा जोवर कायम आहेत, तोवर या अशा वाङ्मयाची निर्मितीदेखील सातत्याने आणि विपुल प्रमाणात होत राहणार आहे. एकंदरीत एस.गुप्तन नायर यांनी म्हटल्याप्रमाणे, ''मध्यमवर्गाच्या वा उच्च सामंतवर्गाच्या अभिरूचीतून कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा जन्म झाला. मध्यमवर्गाची उन्नती, अवनती, स्वप्ने, स्वप्नभंग इत्यादींचे या वाङ्मयप्रकारात विशेष चित्रण झाले आहे. अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीच्या परिणामी इंग्लंड व फ्रान्समध्ये एक नवीन मध्यमवर्ग अस्तित्वात आला. मध्यमवर्गीय लोकांच्या धाडसी जीवनाच्या गरजा रेखाटण्याकडे जुन्या काळाच्या लेखकांचा विशेष ओढा होता. रॉबिन्सन क्रुसो, डॉन क्विकझोट, पिक्विक् वगैरे त्या धाडसाचे साहसी प्रतिनिधी होत.''[३] कादंबरीची कल्पिताशी जोडली गेलेली सांगड पाहता कादंबरी म्हणजे वास्तवापासून दूर असलेले विश्व असते. अशी ही एक धारणा तिच्या उगमापासून निगडीत झालेली आहे. त्यामुळेच अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात युरोपातही कादंबरी वाचन ही चांगली गोष्ट मानली जात नव्हती. काव्य आणि महाकाव्य या वाङ्मयप्रकाराकडे समीक्षकांनी दुय्यम किंवा संमिश्र वाङ्मयप्रकार म्हणूनच

पाहिले असून कादंबऱ्या जीवनाचे उदात्त उन्नत रूप चित्रित करण्याऐवजी निम्नस्तराचे चित्रण करतात, याबद्दल तक्रार केली आहे. कादंबरीविषयी बोलायचे म्हटले तरी अव्वल इंग्रजी काळात कादंबरी वाचन ही फारशी महत्त्वाची बाब मानली जात नसे याचे कारणही हेच आहे. ते जुने समज लोकांच्या डोक्यात आज नाहीत. तरीही कादंबऱ्यांचे वाचन हा वेळेचा अपव्यय आहे असे मानणारे लोक आजही सापडतात. असे असले तरी आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात लिहिला जाणारा साहित्यप्रकार म्हणून कादंबरीकडेच बोट दाखवावे लागेल हेही तेवढेच खरे आहे. 'कादंबरी' हा मानवी जीवनव्यवहारांचे रूप प्रतिबिंबीत करणारा एक आरसा आहे, हे मत पटण्याजोगे वाटत असले तरी कादंबरी आणि आरसा यात मूलभूत स्वरूपाचाच भेद आहे. आरशात मूळ रूपाचे जे प्रतिबिंब उमटते त्याला एकच महत्त्वाचे परिमाण असते ते म्हणजे यथातथ्यतेचे. कादंबरी या अर्थाने जीवनाचे रूप प्रतिबिंबीत करणारा आरसा आहे असे मानता येत नाही. कारण तिच्या द्वारा साकार होणाऱ्या वास्तवाच्या विशिष्ट रूपाला अनेकविध परिमाणे असतात. कादंबरी हा वाङ्‌मयप्रकार स्थिरावण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे चालू प्रगत युगात कादंबरीसारखा एक विस्तीर्ण पट असलेल्या गद्य कथात्म वाङ्‌मयप्रकाराची गरज होतीच. वाङ्‌मयीन कलाविष्काराचे जे सामर्थ्य या वाङ्‌मयप्रकारात आहे ते अन्य वाङ्‌मयप्रकारामध्ये असते तर तिची गरज भासली नसती. कविता आणि नाटक यांच्याइतका कादंबरी वाङ्‌मयप्रकार बंदिस्त स्वरूपाचा नाही. म्हणून हा वाङ्‌मयप्रकार स्थिरावून देखील त्याचे 'काव्यशास्त्र' अजून निर्माण व्हायचे आहे. ते निर्माण करायचे झाल्यास कोणत्या दिशेने प्रयत्न करावे लागतील याचा विचार 'माल्कम कॉडबरी' या अभ्यासकाने 'द नॉलेज अँड इटस्‌ पोएटिक्स' या आपल्या निबंधात केलेला आहे. ओर्तेगा यांच्या मते, कादंबरीमध्ये कोणताही विषय सामावतो. परंतु कादंबरीच्या आंतरिक विश्वात कोणत्या अटींवर हा विषय सामावला जातो यांचेही ओर्तेगा यांनी विवेचन केले आहे.

## मराठी कादंबरीचा उदय

पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजी शिक्षणाचा प्रसार, मुद्रणाची कला इ. बाबींमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात अनेक बदल घडून येऊ लागले होते. युरोपियन व अमेरिकन ख्रिस्ती मिशनरी लोक धर्मप्रसारासाठी भारतातील प्रांतोप्रांतीच्या भाषा शिकत होते आणि त्या भाषांमधून साहित्यनिर्मिती करू लागले होते. प्रांतिक भाषांमधील कोशनिर्मितीचा आणि व्याकरणरचनेचा पहिला प्रयत्न या मिशनऱ्यांनीच केला. एल्फिन्स्टन या काळात मुंबई प्रांताचा शासक होता. त्याचे धोरण उदारमतवादी असल्याने राज्यकर्त्यांनी आपण ज्या प्रजेवर राज्य करतो आहोत, त्या प्रजेला शिक्षण दिले पाहिजे असे त्याचे मत होते. एतद्देशियांना इंग्रजी बरोबरच देशी भाषांचेही शिक्षण दिले पाहिजे, असे एल्फिन्स्टनचे धोरण होते. यातूनच त्या काळात भाषांतरीत शालेय वाङ्मय निर्माण केले. भारतावर इंग्रजी सत्तेचा अंमल होता. त्या काळात मेकॉलेला भारतीय लोकांना इंग्रजी शिक्षणाकडे वळवायचे होते. रक्त व रंगाने जरी भारतीय असले तरी अभिरूची, मूल्ये, मते आणि बुध्दी या दृष्टीने इंग्रजी असा वर्ग मेकॉलेला निर्माण करायचा होता. याच दृष्टीने त्याने इंग्रजी साहित्य व कलांचा प्रसार भारतात करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी राजाराममोहन रॉय यांनी इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार बंगालमध्ये केलेला होता. मात्र इंग्रजी शिक्षणामुळे समाजातील अज्ञान दूर होऊन शिक्षणातील ब्राह्मणांचे वर्चस्व संपेल असा त्यांचा हेतू होता परंतु मेकॉलेचा हेतू मात्र वेगळा होता.

भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्यास सुरवात केली असता त्याचवेळी अमेरिकेत राज्यक्रांती होऊन देश स्वतंत्र झाला होता. त्या देशातील लोकांनी शिक्षण घेऊन इंग्रजी सत्तेविरूद्ध बंड पुकारले होते. त्यामुळे भारतीयांनीही शिक्षण घेऊन आपल्या विरूद्ध उभे राहू नये असे कंपनी सरकारचे धोरण होते. भारतीय लोक आपल्या अंकित राहतील एवढेच शिक्षण त्यांना द्यायचे असा त्यांचा हेतू होता. त्यामुळे देशी भाषांच्या शिक्षणाला जी

चालना मिळाली होती त्या चालनेला आळा बसला आणि हळूहळू मेकॉलेला अपेक्षित होता तसा इंग्रजी शिक्षित मध्यम वर्ग महाराष्ट्रात तयार होऊ लागला. यामध्ये ब्राह्मणवर्गातील लोकांचा जास्त पुढाकार होता. शिक्षणामध्ये ब्राह्मणांचे वर्चस्व जास्त होते. ते रक्ताने जरी हिंदू होते तरी मते, अभिरूची यांनी ते इंग्रजी झाले होते. या वर्गातील लोकांची ज्ञानाची भूक पुढे वाढू लागली. त्यानंतर इंग्रजी शाळा, विद्यापीठे सुरू झाली. त्यामध्ये इंग्रजी शिक्षणाला जास्त प्राधान्य देण्यात आले. भारतीयांची शिकण्याची जिज्ञासा जागी झाली होती. आपल्याकडील संस्कृत साहित्याकडे पाहण्याची दृष्टी बदलली होती. भारतीय समाज शिक्षित झाल्यामुळे पुढे त्यांनी अनेक वृत्तपत्रे व नियतकालिके सुरू केली. लोकहितवादी, महात्मा फुले यांनी खेड्यापाड्यातील लोकांना, मुलांना व स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले. जुने कायदे मोडीत काढून नवे कायदे करण्याचा आग्रह धरला त्यामुळे भारतीय जनतेतील विचारांत बदल झाला. शिक्षणात ब्राह्मणांची असलेली मक्तेदारी कमी झाली. थोडक्यात, शिक्षणामुळे सर्व लोकांमध्ये जागृती झाली आणि त्यांची वैचारिक पातळी उंचावली.

इ.स. १८५० पर्यंत हिंदुस्थानात ब्रिटिश राजवटीचा अंमल सुरू झाला. ब्रिटिशांनी आपल्या बरोबर आपले वाङ्मयही हिंदुस्थानात आणले. त्याची कारणे कोणतीही असोत पण भारतात शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण स्वीकारले. मध्यमवर्ग शिकू लागला. अनेक शाळा महाविद्यालये चालू केली. ज्ञानाची कवाडे खुलू लागली. यातूनच इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास काहीजण करू लागले. कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा उगम इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणातून झाला. कादंबरी हा प्रकार लोकांना आवडतो हे सिध्द होऊ लागले. अनेक कादंबऱ्या प्रसिध्द होऊ लागल्या. इंग्रजी,हिंदी,अरबी भाषेतील पुस्तकांची भाषांतरे प्रसिद्ध होऊ लागली. ब्रिटिश काळात पाश्चात्य संस्कृतीचा हिंदू संस्कृतीशी संयोग झाला. त्यातूनच 'बाबा पद्मनजी' यांनी १८५७ मध्ये 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली कादंबरी लिहिली.

समाजातील प्रश्न मांडण्यासाठी त्यांनी काही निश्चित नैतिक भूमिका घेऊन कादंबरीच्या माध्यमातून भाषिक कृती केलेली आहे. वाचकांची अद्भुत कथा-कादंबरीची आवड लक्षात घेऊन इ.स.१८६१ मध्ये 'लक्ष्मणशास्त्री हळबे' यांनी 'मुक्तामाला' नावाची अद्भूत रसप्रधान कादंबरी लिहिली. त्यानंतर त्यांनीच 'रत्नप्रभा' ही दुसरी कादंबरी लिहिली. या कादंबऱ्यांनी अफाट लोकप्रियता मिळवली. त्यामुळेच अद्भुत व शृंगाररसप्रधान कादंबऱ्यांची संख्या वाढू लागली. 'विश्वासराव' व 'वसंतकोकीळा' या कादंबऱ्याही लोकप्रिय ठरल्या. कादंबरी या वाङ्मयप्रकाराची पाहणी करताना कादंबरीचे स्वरूप तिच्या रचनात्मकतेचे स्वरूप व बोधवादाचे स्वरूप लक्षात घेणे गरजेचे ठरते. मराठी साहित्यात कादंबरी हा वाङ्मयप्रकार इंग्रजी राजवटीत जन्माला आला. तसे पाहिले तर गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ही मानवाची पुरातन प्रवृत्ती आहे. पुराणे, आख्याने, बखरी इ. ग्रंथातून कादंबरीची काही अंगोपांगे जाणवतात हे खरे आहे. इ.स. १८२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोश' या ग्रंथात 'कादंबरी' या शब्दाचा अर्थ एक 'कल्पित कथा' असा दिला आहे.

मराठी कादंबरीचा इतिहास १५० वर्षे इतका जुना आहे. कादंबरी हा प्रकार इंग्रजी साहित्यावरून मराठीत आला. कादंबरी हा इंग्रजीतील नॉव्हेलसाठी वापरला जाणारा प्रतिशब्द आहे. कादंबरी हे नाव बाणभट्टाच्या कादंबरी या ग्रंथावरून रूढ झाले. युरोपमध्ये कादंबरी १८ व्या शतकात उदयाला आली. चीनमध्ये १५ व्या शतकात उदयाला आली. इतरत्र ती कोठेही आढळत नाही असे डायना स्पिअरमन आपल्या नॉव्हेल ॲण्ड सोसायटी या ग्रंथात म्हणतात. इंग्रजी शिक्षणाने स्वसमाजातील दोष दिसू लागले ते दूर करण्यासाठी उपाय सुरू झाले आणि याचवेळी मराठीतील पहिली कादंबरी 'यमुना पर्यटन' अथवा हिंदू विधवांच्या स्थितीचे निरूपण ही बाबा पद्मनजी यांची कादंबरी इ.स. १८५७ मध्ये प्रसिध्द झाली. एकंदरीत १९ व्या शतकात निर्माण झालेली उपरोक्त सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती कादंबरीच्या उदयास अनुकूल अशीच ठरली. नवशिक्षित लेखकांसमोरचे आदर्श

प्राधान्याने इंग्रजी साहित्याचे असल्याने साहित्याची भाषा व्यवहारातल्या भाषेपेक्षा वेगळी असते. हा संकेत रूढ झाला आणि येथेच सामान्य माणूस साहित्यापासून दुरावला. मराठी कादंबरीस दिले गेलेले कादंबरी हे सामान्यनाम संस्कृतपरंपरा निर्देश करते. मात्र तो संबंध नाममात्रच म्हणता येईल. याचा अर्थ मराठी कादंबरीने संस्कृतचे ऋण स्वीकारले नाही असा मात्र होत नाही. मराठी कादंबरीचा उद्‌गम शोधताना काही अभ्यासकांनी संस्कृत व प्राचीन मराठी वाङ्मय भांडाराकडे लक्ष वेधले आहे. उदाहरणार्थ वि.सी.आपटे यांच्यासारखे मराठी साहित्य समालोचक ''मराठी लेखकांसमोर केवळ संस्कृत वाङ्मय नमुन्यादाखल असते तर लघुकथा किंवा कादंबरीचा प्रकार कितपत विकास पावला असता हा प्रश्न आहे, अशी शंका व्यक्त करून मराठी कथा-कादंबरीच्या विकासाचे श्रेय इंग्रजी व फार्सी वाङ्मयभांडारास देतात, तर त्याचवेळी दुसरीकडे राजकीय घडामोडींमुळे सामाजिक जीवनाची घडी इतकी विस्कटली नसती आणि मराठशाहीतील गद्यरचनेच्या प्रकारांची आठवण बुजली नसती व त्यांच्या अवशेषांची जास्त जपणूक झाली असती, तर या फार्सी किंवा इंग्रजी साहित्याशिवायही मराठी कादंबरीची उत्क्रांती झाल्याशिवाय राहिली नसती असे निश्चितपणे म्हणता येईल, असा आशावाद कुसुमावती देशपांडे व्यक्त करतात.''[४] माध्यमातील भेदांची बाजू वगळता आधुनिक कादंबरी आणि कीर्तन, पोवाडे, लावण्या यांच्यातील जीवनदर्शनाची कार्यपद्धती समानच होती असे त्यांनी म्हटले आहे.

भालचंद्र नेमाडे यांनी ''कादंबरी हा साहित्यप्रकार जरी इंग्रजीवरून संयोगाने आला असला तरी एक रचनाप्रकार म्हणून तो हिंदुस्थानात तरी नवा नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. असे सांगून पुढे म्हटले आहे की, लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, बखरी, महिपतीकृत चरित्रे हे रचनाप्रकार कादंबरीशी जुळणारेच आहेत, परंतु आपल्या कादंबरीकारांनी अनुकरणाने रूढ केली तीच कादंबरी असा अंधविचार पुढे येऊन तीन पिढ्या त्यातच गेल्या.''[५]

मीनाक्षी मुखर्जी यांनी कादंबरीच्या उदयाचा विचार मांडताना, ''या

साहित्यप्रकाराच्या वाढीला कारणीभूत असलेले घटक वासाहातिक देशांतील कथनपरंपरांमधूनही निर्माण झाले होते हे नमूद केले आहे. तथापि, त्यांनी हेही स्पष्टपणे मान्य केले आहे की, कादंबरीच्या विकासात इंग्रजी शिक्षण आणि या शिक्षणातून पाश्चात्य साहित्य परंपरेचे झालेले दर्शन हे दोन घटक अत्यंत प्रभावी होते हे खरे आहे.''[६]

मराठी कादंबरीच्या संदर्भात या प्रभावाचे स्वरूप काहीसे संमिश्र स्वरूपाचे आहे. बाबा पद्मनजी यांच्यासारखे लेखक आधुनिक मानवतावादी जाणिवांच्या प्रभावातून यमुना पर्यटन तर लक्ष्मणशास्त्री हळबे आधुनिक जाणिवांना नाममात्र स्पर्श करीत प्राधान्याने संस्कृत आर्ष काव्यांचे आदर्श समोर ठेवून पारंपारिक जाणिवांचा पुरस्कार करताना दिसतात. त्याचवेळी नारो सदाशिव रिसबूड यांच्यासारख्या लेखक इंग्रजी कादंबरीचे आदर्श समोर ठेवून लिहित असताना मराठी लोकांत वर्णनयोग्य सद्गुण किंवा दुर्गुण आढळत नाहीत. याबद्दल खंत व्यक्त करताना दिसतात. इंग्रजी कादंबऱ्या वाचल्यामुळेच कादंबरी हे एक संसारचित्र असते याची जाणीव मराठी लेखकांना झाली. याकाळात करण्यात आलेली कादंबरीची व्याख्या लक्षात घेतली तरी इंग्रजी कादंबरीचा आणि तत्संबंधी समीक्षेचा हा प्रभाव लक्षात येतो.

कादंबरी म्हणजे कल्पित गोष्ट ही धारणा याच काळात निर्माण झाली असेही नाही. कारण कादंबरीसाठी 'कल्पित कथा' हा शब्द बऱ्याच आधीपासून वापरला जात होता असे दिसून येते. इ.स. १८२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोश' या शब्दकोशात दिलेल्या कादंबरी या शब्दाच्या अर्थावरून कुसुमावती देशपांडे यांनी असा अंदाज व्यक्त केला आहे की, एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रूढ असावे असे दिसते. अ.का.प्रियोळकर यांच्या मते, संस्कृत भाषेत बाणाची कादंबरी नावाची जी कल्पित बृहत्कथा आहे. तशासारखा मराठीतील वाङ्मयप्रकार म्हणून मराठीतील कल्पित दीर्घकथेला कादंबरी हे नाव मिळाले.

रा.भि.गुंजीकर व इतर लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांना 'कल्पित कथा' असेच

म्हटले आहे. पुढे इ.स. १८७२ मध्ये का.बा.मराठे यांनी कादंबरी किंवा कल्पित गोष्ट हे शब्द न वापरता 'नावल' हा शब्द जसा आहे तसाच वापरला आहे. लक्ष्मणशास्त्री हळबे आदींनी संस्कृत कादंबरीवरून हे नाव स्वीकारले असावे असे मानले, तरी त्याआधी इ.स. १८२९ मध्ये 'महाराष्ट्र भाषेचा कोश' या शब्दकोशातील उपरोक्त अर्थ कोणत्या आधारावर दिला गेला या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

आगरकर-चिपळूणकर यांच्यासारख्या विद्वानांची मते पाहिली, तर या काळात कादंबऱ्यांचे लेखन वाचन हा मनोरंजनाचाच विषय मानला गेला आहे असे दिसून येते. कादंबऱ्यांतील शृंगारवीरादी रसांमुळे वाचकांची मने बिघडतात असे चिपळूणकरांचे मत आहे. वाङ्मयाकडे ते कलाविष्कार म्हणून पाहण्याऐवजी उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून पाहतात. या संदर्भात उषा हस्तक यांनी मांडलेले मत, ''आगरकर-चिपळूणकरांच्या वाङ्मयीन अभिरूची असलेल्या व्यक्तींनादेखील वाङ्मयाकडे सामाजिक व नैतिक उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून पाहावे व वाङ्मयप्रकारांना चार घटका अपायकारक करमणूक करणारी साधने एवढीच किंमत द्यावी, हाच एक चमत्कार वाटतो. ज्या बुद्धिमान सुशिक्षितांनी वाङ्मयाच्या स्वरूपाचा गंभीरपणे विचार करायला हवा होता, त्याची प्रतिष्ठा वाढवायला हवी होती, अधिकाधिक सुशिक्षितांना वाङ्मयीन चळवळीकडे खेचावयास हवे होते, त्यांनीच असा तुच्छतेचा दृष्टिकोन स्वीकारल्यामुळे स्वाभाविकपणेच या काळातील वाङ्मयाचा दर्जा फारसा उंचावू शकला नाही.''[७]

## मराठी कादंबरीच्या व्याख्या

थोर तत्वज्ञ हेगेलने म्हटले आहे की, आधुनिक काळात उदयास आलेला कादंबरी हा साहित्यप्रकार म्हणजे महाकाव्याचा पर्याय आहे. जिच्यात जीवनाचे महाकाव्यसदृश्य व्यापक व विस्तृत जीवनदर्शन व्यक्त केले जाते. अशा आधुनिक काळात उदयास आलेल्या कादंबरीने गद्यात्म रूपात प्रकट व्हावे हेच स्वाभाविक ठरते. कोणतीही कादंबरी स्वयंभू

असू शकत नाही. ती घडवावी लागते आणि विशिष्ट द्रव्याच्या साहाय्याने घडवावी लागते. प्रत्येक कादंबरीच्या घडणीमध्ये तिचे स्वत:चे असे वैशिष्टय सामावलेले असते. तिच्या या स्वतंत्र वैशिष्टयांमुळेच एका कादंबरीची घडण दुसऱ्या कादंबरीच्या घडणीहून भिन्न बनते. अनेक समीक्षकांनी कादंबरीची व्याख्या देण्याचा प्रयत्न केला असला तरी अनेकांनी अशी व्याख्या देता येत नसल्याची कबूलीही दिलेली आहे. तथापि रा.ग.जाधव यांची पुढील व्याख्या सुलभ वाटू लागेल. जाधव लिहितात, ''कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.''[८]

कादंबरीच्या व्याख्येविषयी मतभेद संभवत असले तरी कादंबरी हे लेखकाने निर्मिलेले कल्पित रूप असते, याविषयी मतभेद नाहीत. या ठिकाणी कादंबरीतील कल्पित काय आणि कोणत्या अर्थाने कादंबरी हे कल्पित रूप असते हे स्पष्ट करणे उचित ठरेल. त्या आधी एक बाब लक्षात घेतली पाहिजे, ती अशी की, कादंबरीतून चित्रित होते ते प्रामुख्याने मानवी मन, मानवी जीवन. परंतु येथे माणूस प्रत्यक्षात जगत असलेले जीवन आणि कादंबरीतील जीवन यातील भेदही लक्षात घेतला पाहिजे. कादंबरी हे तिच्या निर्मात्याला जीवनाचे एक भावलेले रूप असते. या संदर्भात कुसुमावती देशपांडे लिहितात, ''पार्थिव संसाराविषयीची आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्वदर्शित्वाचा किंवा अद्‌भुताचा मार्ग धरून मूलत: मानवी मनाचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन. जीवनविषयक अनुभव वा कल्पना कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री. ही वृत्ती, हा दृष्टिकोन, हे अनुभव या कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्या व्दारे व्यक्त करणे ही कादंबरीची पध्दती.''[९]

१) पाश्चात्य कादंबरीचा जनक फील्डींग यांच्या मते,''गंभीर वातावरणात नसलेले गद्य महाकाव्य म्हणजे कादंबरी होय.''[१०]

२) मा.का.देशपांडे यांच्या मते, ''कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य चित्र होय.''[११]

३) एम.ॲबेल चेव्हेली या फ्रेंच लेखकाच्या मते ''जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा म्हणजे कादंबरी होय.''[१२]

४) मनोविश्लेषणास प्राधान्य देणारे टीकाकार यांच्या मते, ''ह्दयान्तरंगाचे अविष्करण अथवा मानवी हृदयाचा सूक्ष्म कलात्मक अभ्यास म्हणजे कादंबरी होय.'' तर काही टीकाकार ''आकर्षक कथानक हाच कादंबरीचा आवश्यक घटक म्हणजे कादंबरी होय.''[१३] अशी व्याख्या करतात.

५) न्यू इंग्लिश डिक्शनरीकर यांच्या मते ''भरपूर विस्तार असलेली मानवी जीवनातील व्यक्ती व त्यांच्या कृतीचे कथानकातून दर्शन घडवणारी काल्पनिक गद्य गोष्ट किंवा कथा म्हणजे कादंबरी होय.''[१४]

अव्वल इंग्रजीत, सांस्कृतिक विकासाबाबत मराठी समाजाला पुन्हा जणू बाल्यावस्था प्राप्त झाली होती. या बाल्यावस्थेच्या सूचक अशा दोन गोष्टी मराठी कथा, कादंबरी वाङ्मयात प्रतिबिंबीत झालेल्या दिसतात. पहिली अनुकरणाची व दुसरी भाषांतराची म्हणूनच या कालखंडाला भाषांतराचा किंवा रूपांतराचा काळ असे म्हणतात. यामध्ये केवळ इंग्रजी भाषेतील ग्रंथाचे भाषांतर होत नसे तर संस्कृत, फार्शी, उर्दू या भाषांतील भाषांतरे विद्वानांकडून होऊ लागली. अद्‌भूत कादंबऱ्यांना हा काळ अनुकूल होता, हे आपल्याला रामायण, महाभारत या पद्यमय ग्रंथावरून लक्षात येते.

ब्रिटिशांनी भारतावर आक्रमण करून आपली सत्ता प्रस्थापित केली. ब्रिटिशांच्या आगमनाने पेशव्यांचे राज्य संपुष्टात आले. पेशवाईचे वैभव व रावबाजींच्या वेळच्या लोकांची मनोवृत्ती ही मात्र शिल्लक राहिली होती. या रचनेला खुमासदार खाद्य लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' (१८६१) ना.स.रिसबुडांची 'मंजुघोषा' (१८६८) व गुंजीकरांची

'मोचनगड' इ. मराठीतील स्वतंत्र कादंबऱ्यांनी इ.स. १८७० च्या आसपास चांगलेच खाद्य पुरविले. इंग्रजी शिक्षणामुळे काळाप्रमाणे माणसे सुशिक्षित होऊ लागली होती. त्यामुळेच "अद्‌भूत कादंबऱ्यांकडील ओढा कमी होवून तिचा कल वास्तविकाकडे झुकू लागला. परंतु हा ओढा एकाएकी कमी होणे शक्य नव्हते. अद्‌भूताला व वास्तविकाला साधणारा एक दुवा आवश्यक होता. त्यामुळे अद्‌भूततेला नवीन प्रांत शोधून काढणे आवश्यक होवून बसले."[१५]

"ऐतिहासिक कादंबरीचा उगम अशा परिस्थितीत झाला की, ज्या काळात मराठी कादंबरीचा उदय आणि उत्साह होता, त्यामुळे ऐतिहासिक कादंबरीच्या जन्माची देखील 'दीर्घकाळ वाट पहावी लागली नाही.' रा.भि.गुंजीकरांची 'मोचनगड' ही पहिली ऐतिहासिक कादंबरी (१८६७) पासून विविध ज्ञान विस्तारात क्रमश: प्रसिध्द होऊ लागली."[१६]

मुंबई विद्यापीठाची स्थापना इ.स. १८५७ मध्ये झाली. या विद्यापीठातून अनेक पदवीधर बाहेर पडले. त्यांचा इंग्रजी वाङ्‌मयाशी परिचय झाला. त्यामुळे वाचकांची संख्या वाढली व समाजही खडबडून झोपेतून जागा होवून आत्मनिरीक्षण करावयास लागला होता. त्यादरम्यान चिपळूणकर, रानडे, वि.ज.कीर्तने यांच्या लेखनामुळे लोकांच्यामध्ये इतिहासाबाबत कुतूहल, जिज्ञासा उत्पन्न होवून पूर्वजांविषयी मनात तीव्र अभिमान निर्माण झाला. यातूनच त्या काळातील मराठी मनाची अद्‌भुततेविषयी आवड कमी होवून ऐतिहासिक कादंबरी अवतीर्ण झाली. इंग्रजी शिक्षणामुळे समाजातील दोष दिसू लागले ते दूर करण्यासाठी उपाय सुरू झाले. त्यावेळी लोकांची अभिरूची ऐतिहासिकतेकडून वास्तवतेकडे वळली. यातूनच इ.स. १८५७ मध्ये बाबा पद्‌मनजी यांची 'यमुना पर्यटन' ही सामाजिक कादंबरी अवतीर्ण झाली.

हरिभाऊपूर्व कादंबरीची स्थिती, तिने साधलेले यश याबद्दल समीक्षक म्हणतात, "नवीन निर्मितीची आवड, समकालीन काळातील घडामोडी कधी उघड तर कधी

आडपडद्याने वर्णन करण्याची हौस, वाङ्मयीन वर्णने जुन्या साहित्यशास्त्राच्या कसोटीला उतरतील अशी करण्याची रूढीप्रियता, मराठी भाषा एकसारखी चलनात राखून तिचे ग्रांथिक स्वरूप व्युत्पन्न, अभिजात आणि विस्तृत करण्याची कुशलता अद्‌भुताची प्रीती व वास्तवाची थोडीफार जाणीव इ. वैशिष्ट्ये स्पष्टपणे दिसतात.''[१७]

इ.स.१८८५ पासून कादंबरी ह्या वाङ्मयप्रकाराचे खरेखुरे रूप लक्षात येऊन मराठी कादंबरीच्या संसाराला सुरूवात झाली ती हरिभाऊ आपट्यांपासून. मराठी कादंबरीचे कलात्मक व बोधात्मक ऐश्वर्य अनेक पटीने वृध्दिंगत झाले. यातूनच कादंबरीचे स्वतंत्र, प्रौढ प्रभावी स्वरूप प्रकट झाले.

**कादंबरीचा विकास**

इ.स. १८५० पर्यंत ब्रिटिशांचा हिंदुस्थानात एकछत्री अंमल सुरू झाला होता. ब्रिटिशांनी आपली राजवट हिंदुस्थानात स्थापन करताना आपले वाङ्मयही हिंदुस्थानात आणले. त्यांचे वाङ्मय हिंदुस्थानात आणण्याची कारणे कोणती का असेनात, पण हिंदुस्थानात शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण ब्रिटिशांनी स्वीकारले होते. त्यासाठी त्यांनी अनेक शाळा व महाविद्यालये चालू केली. मध्यमवर्ग शिकू लागला. ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी खुली होऊलागली. त्यामुळे काहीजण इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास करू लागले. या प्रकारचे वाङ्मय आपल्या मराठी भाषेमध्ये का असू नये असे येथील लोकांना वाटू लागले आणि त्यातूनच मराठी कादंबरीचा जन्म झाला.

मराठी कादंबरीच्या जन्मामुळेच 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराचा इ.स. १८५० ते इ.स. १९८० या काळात विविधांगी विकास झाला. उदा. प्रचारात्मक, वैचारिक, कलात्मक इ. या विकासासाठी अनेक कादंबरीकारांनी आपले योगदान दिले. यातूनच विकासाचे विविध टप्पे पाडण्यात आले आहेत.

१) १८५७-१८८५

बाबा पद्मनजी, लक्ष्मणशास्त्री हळबे, वि.ज.पटवर्धन, ना.स.रिसबूड, रा.भि.गुंजीकर, ग.वि.कानिटकर, के.ल.जोरवेकर, रामचंद्र आबाजी राजे, म.वि.रहाळकर इत्यादी.

२) १८८५-१९२०

हरी नारायण आपटे, चिं.वि.वैद्य, सहकारी कृष्ण, नाथमाधव, सी.के.दामले, ना.ह.आपटे, वि.वा.भिडे, बा.स.गडकरी, वि.वा.हडप, गुर्जर इत्यादी.

३) १९२०-१९३९

वा.म.जोशी, डॉ.श्री.व्यं.केतकर, ना.सी.फडके, पु.ल.देशपांडे, वि.स.खांडेकर, ग.त्र्यं.माडखोलकर, मामा वरेरकर, न.चि.केळकर, दा.न.शिखरे, ना.वि.कुलकर्णी, वि.वि.बोकील, जानकीबाई देसाई, विभावरी शिरूरकर, गीता साने इत्यादी.

४) १९३९-१९४७

विश्राम बेडेकर, र.वा.दिघे, बा.सी.मर्ढेकर, द.र.कवठेकर, ग.ल.ठोकळ आणि साने गुरूजी इत्यादी.

५) १९४७-१९६०

श्री. ना.पेंडसे, गो.नि.दांडेकर, पु.भा.भावे, ह.श्री.शेणोलीकर, व्यंकटेश माडगूळकर, वसंत कानेटकर इत्यादी.

६) १९६०-१९८०

प्रा. गंगाधर गाडगीळ, भालचंद्र नेमाडे, जयवंत दळवी, चिं.त्र्यं.खानोलकर, पु.शि.रेगे, भाऊपाध्ये, पु.ल.देशपांडे, प्र.के.अत्रे, आनंद यादव, उध्दव शेळके, बा.भ.बोरकर, द.मा.मिरासदार इत्यादी.

## कादंबरीच्या विकासात्मक वाटचालीचा प्रारंभ -

१९ व्या शतकात इंग्रजी राजवटीचा अंमल हिंदुस्थानावर होता. इंग्रजी राजवटीने व इंग्रजी साहित्याने घातलेली भुरळ कमी होऊ लागली. पारतंत्र्याच्या कल्पनेने अनेक लोक अस्वस्थ होऊ लागले. या पारतंत्र्याच्या भावनेतूनच बाबा पद्मनजी यांनी पहिली स्वतंत्र 'यमुना पर्यटन' ही सामाजिक कादंबरी लिहिली.

याच काळात हिंदुस्थानातील लोकांना पारतंत्र्याविषयी चीड निर्माण झाली. अंतर्मुख होऊन देशाच्या अवनतीबद्दल लोक विचार करू लागले. हिंदुस्थानातील इतिहासाविषयी व परंपरेविषयी त्यांच्यात अभिमान जागृत झाला. जनतेत असलेली मरगळ झटकून टाकण्यासाठी साहित्याच्या माध्यमातून इतिहास समजावून देण्याची गरज भासू लागली. आपल्या देशातील थोर, पराक्रमी वीर पुरूषांची ओळख करून देऊन लोकांच्यामध्ये गुलामगिरी व अन्यायाविरूध्द चीड, व्देष निर्माण करून देणे हे साहित्यकाराचे कर्तव्यच आहे ही भावना लोकांच्यामध्ये रूजू लागली. आणि यातूनच ऐतिहासिक कादंबरीचा उगम झाला. राष्ट्राची व समाजाची गरज ओळखून १८७१ मध्ये रा.भि.गुंजीकरांनी 'मोचनगड' ही कादंबरी लिहून ऐतिहासिक कादंबरी लिहिण्याचा पहिला मान मिळविला.

या कालखंडात कादंबरीचे स्वरूप हे अद्भुत, पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक या ना त्या रीतीने बोधपर व मनोरंजनपर होते. लेखकांच्यावर व मराठी साहित्यावर इंग्रजी, संस्कृत व फार्सी साहित्याचा प्रभाव पडलेला दिसतो. कादंबरीच्या माध्यमातून लोकांच्यामध्ये देशप्रेम जागविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला दिसतो. ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी खुली झाल्यामुळे सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी कादंबरी हा साहित्यप्रकार योग्य आहे याची जाणीव होऊ लागली. यातूनच 'यमुनापर्यटन','शिरस्तेदार', 'अवलिया' अशा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या व मराठी कादंबऱ्या सामाजिक प्रश्नाकडे झेप घेऊ लागल्या.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## हरिभाऊकालीन मराठी कादंबरी (१८८५-१९२०)

हरिभाऊ आपटे हे ध्येयवादी सुधारक होते. त्याचबरोबर एक अव्वल दर्जाचे संवेदनशील कलावंतही होते. इंग्रजी कादंबरीचे संस्कार पचवून वास्तवाला सामोरी जाणारी वास्तववादी मराठी कादंबरी हरिभाऊंनी घडवली. 'मधली स्थिती' पासून सुरूवात केल्यानंतर पुढील अनेक सामाजिक कादंबऱ्यातून त्यांनी महाराष्ट्रीयन समाजजीवनाचा प्रदीर्घ असा कालपट आपल्या कादंबऱ्यांमधून उलगडला आहे. यमुनापर्यटन कादंबरीनंतर हे प्रथमच घडत होते म्हणूनच या संदर्भात असे म्हणता येईल की, बाबा पद्मनजी यांच्यानंतर मराठी कादंबरीला हरिभाऊंनीच ज्वलंत समाजवास्तवाचा स्पर्श घडवला.

अव्वल इंग्रजी काळात मिल, स्पेन्सर आदी विचारवंतांमुळे मानवतावाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही जी आधुनिक मूल्ये रूजली त्यांचा परिणाम हरिभाऊंच्या कादंबऱ्यातून व्दिगुणित होतो. खऱ्या अर्थाने त्यांनीच सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरीला कलात्मक दर्जा मिळवून दिला. या कालखंडात मराठीमध्ये सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या निर्मितीला जोराची चालना मिळून त्यांच्या संख्येतही पुष्कळच वाढ झाली. या सर्व कथा कादंबरीकारांचे हरिभाऊ आपटे हे सम्राट आहेत. कथानकाची गुंफण, मनुष्यस्वभाव रेखाटन, स्वभावाचे सूक्ष्म व मार्मिक अवलोकन, जीवनदृष्टीचे व्यापकपण, वास्तववाद आणि ध्येयवाद यांचे रम्य व स्फूर्तिदायक संमीलन या सर्व गुणांच्या दृष्टीने हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांचे स्थान या कालखंडात केवळ अव्दितीय व अनन्यश्रेष्ठ आहे. या काळातील कादंबऱ्यांची निर्मिती समाज सुधारणेला पोषक असलेल्या ध्येयवादाच्या प्रचाराचा हेतू बाळगून झाली आहे. या कालखंडातील लेखकांनी पांढरपेशा मध्यमवर्गीयांच्या, समाजातील दुर्दैवी आणि दुःखी विधवांच्या सुख दुःखाचाच विचार केला आहे. स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचार यांना वाचा फोडण्याचे काम या लेखकांनी केले आहे. तसेच स्त्रियांच्या शिक्षणाबद्दलही समाजात जागृती करण्यात या कादंबरीकारांना

यश मिळाले आहे. त्याचबरोबर मुलांच्या जीवन विकासाचा विचार हरिभाऊ आपटे व नारायण आपटे यांनी केला आहे. या काळातील कादंबऱ्यांनी अविभक्त कुटुंब पध्दतीच्या दुष्परिणामांचे दिग्दर्शन अत्यंत परिणामकारक रीतीने केल्यामुळे विभक्त कुटुंबपध्दती व व्यक्तिस्वातंत्र्याला वाव देण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले. यातूनच पुढे गांधीवाद, मार्क्सवाद, फ्रॉईड यांचा प्रभाव मराठी साहित्यावर पडून मराठी कादंबरीला पुढील काळात वेगळेच वळण लागले.

## १९२० नंतरची मराठी कादंबरी -

१९२० नंतरच्या काळात सुरू झालेले पांढरपेशा मध्यमवर्गीय समाज जीवनाचे स्थित्यंतर हरिभाऊनंतरच्या तथाकथित सामाजिक कादंबरीत आपणास कितपत जाणवले, असा प्रश्न निर्माण करून पहिल्या महायुध्दानंतर एकत्र कुटुंबपध्दती हळूहळू नष्ट होऊ लागली हे खरे असले तरी, त्यानंतरचे समाजजीवन व्यक्ती आणि कुटुंब यांच्या सहजीवनातूनच आकार घेत आले असताना त्याचे चित्रण मात्र या सामाजिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कादंबरीत आलेले नाही, ही वस्तुस्थिती नोंदवून वा.ल.कुलकर्णी पुढे लिहितात, "ह्या नंतरच्या काळातील अनेक कादंबरीकारांना आपण सामाजिक कादंबऱ्या लिहतो, आपण हरिभाऊंनाच गुरूस्थानी मानतो असे प्रामाणिकपणे वाटलेले असले तरी प्रत्यक्षात त्यांच्या कादंबऱ्यांची बैठक बदलली. तिच्यात भोवतालच्या समाजजीवनासंबंधीच्या मग ते व्यक्ती, कुटुंब किंवा समाज ह्यापैकी कोणाचेही जीवन असो कुतुहलाला, गंभीरपणे केलेल्या चिंतन-निरीक्षणाला, कमी कमी महत्व प्राप्त होत गेले व त्यांची जागा 'जीवनवाद', 'कलावाद', 'वास्तववाद' व 'ध्येयवाद' असल्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या दृष्टिकोनांशी संबध्द असे विशिष्ट परिणाम साधू पाहणाऱ्या कृत्रिम चित्रणांनी घेतली जाऊलागली, म्हणून तर हरिभाऊंनंतरच्या मराठी कादंबरीला 'सामाजिक' ह्याच नावाने संबोधताना हरिभाऊंनी त्या उपाधीला आपल्या कादंबरीलेखनाने प्राप्त करून दिलेला अर्थ आपण बदलीत नव्हे विटाळीत आहोत असे सारखे वाटल्यावाचून

राहत नाही.''[१९]

१९२० ते १९५० हा काळ प्रकृतिभिन्नतेने गजबजलेला आणि कादंबरीनिर्मितीच्या दृष्टीने विपुलतेचा असला तरी या काळातील कादंबरी ही मध्यमवर्गीय जाणिवांची निर्मिती आहे. वा.म.जोशी, केतकर, वरेरकर, रघुवीर सामंत, विभावरी शिरूरकर, र.वा.दिघे यांच्यासारखे काहीशा निराळ्या जाणिवा व्यक्त करू पाहणारे लेखक या काळात दिसत असले तरी एकंदरीत या कालखंडावर फडके-खांडेकर-माडखोलकर यांचाच प्रभाव दिसतो. त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे सुखवादाच्या आहारी गेलेल्या समाजविन्मुख व्यक्तिवादी जाणिवांची परिणती आहे. सामाजिक वास्तवापासून आणि संदर्भापासून पूर्णपणे विलग असलेले प्रणयचित्रण हा व्यक्तिवादी जाणिवांचा उथळ अविष्कार आहे. या संदर्भात खांडेकरांनी केलेले विधान, ते लिहितात, ''प्रीतीचे विविध रंग हा पाश्चात्य लेखकांचा आणि वाचकांचा अनुभूतीचा विषय आहे. आमच्याकडे तो अनुकरणाचा, कुतुहलाचा, व्यवहारदृष्ट्या अतृप्तीचा आणि म्हणूनच विकृतीचा विषय झाला आहे. प्रेमकथा म्हणजे कामकथा असा संकेत वाङ्मयात पडू पाहत आहे.''[२०] या कालखंडातील कादंबरी मध्यमवर्गीय जीवनाभोवतीच गुरफटलेली दिसते. जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारी किंवा जीवनातील समस्यांना, आव्हानांना सामोरी जाणारी कादंबरी निर्माण होणे कठीण होते. मात्र हे रिंगण तोडण्याचा प्रयत्न या काळात धाडसाने पुढे आलेल्या स्त्रियांनी केला. कादंबरी लिहिण्यास सुरूवात करून अनेक उत्कृष्ट कथा-कादंबऱ्या लिहून आपला ठसा उमटविला. या कालखंडात भाषांतरीत, रूपांतरीत, वर्णनपर कादंबऱ्यांचा प्रवाह वाहत होता.

**मराठी कादंबऱ्यातील साठोत्तरी वाटचाल -**

हा कालखंड म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंड होय. या कालखंडामध्ये युध्दामुळे देशांतर्गत तेढ वाढू लागली. सीमाप्रश्न, प्रांतभेद, आर्थिक विषमता इ. विषयांवर कादंबरी

लेखनाची उभारणी होऊ लागली. स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यावर दुसरे महायुध्द, गांधीवाद, मार्क्सवाद, भारत-पाक युध्द, चीन युध्द, सार्वत्रिक शिक्षणप्रसार, पाश्चात्य वाङ्मयीन प्रवाहांचा वाढता परिचय, बदलते समाजजीवन इ. अनेक घटकांचा प्रभाव पडला आहे. या कालखंडात दलित साहित्यांची निर्मिती झाली. यातून दलितांचे प्रश्न, त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार यांच्या वास्तवाचे चित्रण कादंबरीच्या माध्यमातून समाजासमोर मांडले जावू लागले. दलित जीवनाचे संपूर्ण चित्रण कादंबरीतून रेखाटले जावू लागले. तसेच पुढे आदिवासी साहित्य निर्माण होऊन त्यांचे दु:ख,वेदना, जीवन पध्दती प्रगट करण्यात आली. याच काळात ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक अशा कादंबऱ्यांची निर्मिती होत होती.

या कालखंडात काही महत्वपूर्ण व्यक्तींच्या जीवनावर कादंबरीलेखन होऊलागले. उदा. शिवाजीराव सावंत यांची मृत्युंजय ही कादंबरी. तसेच वास्तववादी, अस्तित्ववादी, अतिअस्तित्ववादी अशा कादंबऱ्यांना उधाण आले.

कादंबरीत व्यक्ती आणि तिच्या संबंधित घटनांनी युक्त अशा कथेस रूप लाभते ते खरे, परंतु व्यक्ती म्हणून स्वतंत्र नसते तर ती भोवतालच्या समाजजीवनाचा एक घटक असते. या समाजजीवनाचा अनुबंध तोडून तिचा विचार करता येत नाही. समाज हे व्यक्तीचे अधिष्ठान असते आणि समाजाला एक इतिहास असतो. अशा रीतीने ''इतिहासातून प्रकटणारी सामाजिक संदर्भ अनुस्यूत असलेली व्यक्ती ही सर्व कलांची अधिष्ठात्री असते. कोणीही व्यक्ती समाजात पूर्णांशाने विलीन होऊ शकत नाही, तशीच ती समाजेतिहासाच्या प्रवाहाशी किंवा व्यावहारिक संदर्भाशी पूर्णांशाने फटकून राहू शकत नाही. म्हणून कादंबरीलाही आपोआपच सामाजिक परिमाण लाभते.''[२१]

''कल्पित गोष्टीप्रमाणे कादंबरीचे रूप कथात्म असले तरी तिच्या कथात्म रूपाच्या अभिव्यक्तीत अंतर्भूत असलेली जीवनदर्शनाची जाणीव अधिक महत्त्वाची असते. वाचकांचे चार घटका मनोरंजन करण्यासाठी खऱ्या कादंबऱ्या जन्माला येत नाहीत.

जीवनानुभूतीचा अपरिहार्य असा कलात्मक आविष्कार म्हणून त्या अस्तित्वात येतात.''[२२]

कादंबरी हे आपल्या काव्याचे चित्र असते, असे मानल्यानंतर तिच्यात सामाजिक जीवन आशयरूपाने येणे अपरिहार्य ठरते. सामाजिक वास्तव हे कादंबरीचे आशयद्रव्य असते. कादंबरीत व्यक्ती-कुटुंब-समाज असे संबंध चित्रित होत असले तरी अंतिमत: त्यातून मानवी स्वभाव चित्रित झालेले असतात. अनुभवाची आंतरिक लय कादंबरीचा घाट ठरवीत असते. कोणत्याही कादंबरीवर घाट बाहेरून लादता येत नाही. प्रत्येक कादंबरी आपला स्वतंत्र घाट घेऊनच अवतरते.

व्यावहारिक सत्य आणि कलात्मक सत्य यांच्यातील नाते कोणते असते आणि व्यावहारिक सत्याची बूज कलावंत कशी राखतो हे सांगताना गो.म. कुलकर्णी लिहितात, ''तसे पाहिले तर व्यावहारिक सत्य आणि कलात्मक सत्य यांचे वैर नसून ती परस्परपूरक असतात. श्रेष्ठ कलाकाराला समकालीन व्यामिश्र वास्तवाचे योग्य ते भान राखावेच लागते. तो त्याच्या निर्मितीचा प्रारंभबिंदू असतो. मात्र, तो समकालीन बाह्य घडोमोडीत कायमचा गुरफटत नाही. त्याच्या अतीत जाण्याचा, त्याच्या अंतरंगात प्रवेश करण्याचा तो प्रयत्न करतो. पण हे करताना त्याने बाह्य वास्तवाला बगल दिलेली नसते, तर बाह्य वास्तव पचवून त्यावर स्वामित्व संपादन केलेले असते.''[२३]

थोडक्यात, कादंबरी हा समाजवास्तवनिष्ठ असा साहित्यप्रकार आहे. मानवी मन, जीवन आणि त्याभोवतीचा समाज यांच्या प्रत्ययकारक चित्रणासाठीच खरी कादंबरी लिहिली जाते. आपल्या कादंबरीतून जे विश्व कादंबरीकार उभे करीत असतो. त्याव्दारे त्याला आपली म्हणून काही विशिष्ट भूमिका स्पष्ट करावयाची असते.

एकंदरीत कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा आजवरचा इतिहास पाहता त्याची प्रकृती समाजाच्या वास्तवाशी निगडीत अशीच राहिली आहे. कादंबरी साहित्याचा विकास

अखंडपणे सुरू आहे आणि त्यात नवनवीन विषयांची भर पडत आहे.

**कादंबरीचे स्वरूप**

कथात्मक लेख फार पूर्वीच्या काळापासून समाजाची सोबत करीत आले आहेत. मध्ययुगीन मराठी वाङ्मयात स्फूटकथा आणि आख्याने विपुल प्रमाणात आढळतात. त्यापूर्वी बाणाची कादंबरी आपल्याकडे होती. कथेला कादंबरी हे नाव पूर्वीपासून असावे. कारण इ.स. १८२९ च्या 'महाराष्ट्र भाषा कोशात' या शब्दाचा तसा अर्थ आहे. बाणाच्या कथेच्या नायिकेचे नाव कादंबरी होते. या ग्रंथाचे नाव कादंबरी असले तरी प्रत्यक्षात गद्य-पद्यात्मक लेखन असे त्याचे स्वरूप होते. या कृतीचे नाव या वाङ्मय प्रकाराला मिळाले आणि मराठी साहित्यात ते दृढ झाले.

कादंबरीच्या व्याख्येवरून तिच्या स्वरूपाची कल्पना येते. पाश्चात्य कादंबरीचा जनक फिल्डींग, ''गंभीर वातावरण नसलेले महाकाव्य''[२४] असे म्हणून कादंबरीला महाकाव्याप्रमाणे समजतो. ''कार्यकारण शृंखलाबध्द रचना असलेली कादंबरी''[२५] असे श्री.मा.कुलकर्णी म्हणतात. ''सत्यसृष्टीच्या आधारे काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून जीवनातील गुंतागुंतीवर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मयविभाग म्हणजे कादंबरी.''[२६] अशी व्याख्या बापट, गोडबोले करतात. सारांश व्यक्तिचित्रणाबरोबर नायकाचे मनोव्यापार स्पष्ट करणारी कादंबरी भावानुभव, आत्मशोध आणि जीवनचित्रण करणे या वैशिष्ट्यांनी युक्त आहे.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार महाकाव्यासारखा आहे. महाकाव्याप्रमाणे कादंबरीमध्ये एखाद्या देशातील समूहाचे विस्तृत स्वरूपाचे जीवनचित्रण केलेले असते. त्यांचे यश, अपयश, सुखदु:खे, रूढी, परंपरा, आशा-आकांक्षा, धर्मसंस्कृतीच्या अनेक महत्वाच्या गोष्टी ज्याप्रमाणे महाकाव्यात प्रतिबिंबीत होतात. तशा त्या कादंबरीतही प्रतिबिंबीत होतात.

मराठी साहित्यातील एक समृध्द दालन म्हणजे मराठी कादंबरीचे विश्व होय.

अखिल भारतीय पातळीवर मराठी व बंगाली साहित्य हे समृध्द मानले जाते. अनेक लेखकांनी विविध विषय हाताळलेले आहेत. तत्कालीन समाजजीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकांनी केला आहे. त्या-त्या काळाच्या समाजजीवनाचे प्रतिबिंब तत्कालीन कादंबरीत दिसून येते. सामाजिक समस्या हाताळणाऱ्या कादंबऱ्या अशा अनेक पदरांनी युक्त असलेले मराठी कादंबरीविश्‍व मनाला भुरळ घालते.

कादंबरी या वाङ्मयप्रकारात लेखकाची जीवनदृष्टी महत्वाची असते. या जीवनदृष्टीच्या व्यापकतेवर, सखोलपणावर आणि मौलिकतेवर कादंबरीची महत्ता अवलंबून असते. ही जीवनदृष्टी संपन्न बनविण्यासाठी लेखकांचे सूक्ष्म जीवननिरीक्षण माणसाच्या मनोव्यापाराच्या गुंतागुंतीचे त्याचे ज्ञान,जीवन व्यापाराचे आकलन इ. गोष्टी महत्त्वाच्या असतात. लेखकाची जन्मजात प्रतिमेची झेप आणि व्युत्पन्नता व अभ्यास यीन जीवदृष्टी समृद्ध बनत असते. कादंबरीत काही व्यक्तींच्या द्वारा लेखक जीवनाचे आपले निरीक्षण व आकलन प्रकट करत असतो. जीवनातले तरल क्षण पकडण्यापासून ते संपूर्ण समाज जीवनाचे दीर्घकालीन जीवनचित्रण करण्याचे सामर्थ्य कादंबरी वाङ्मयात आहे.

कादंबरी हा साहित्यप्रकार आधुनिक असला तरी त्याचे बीज फार जुने आहे. समाज जीवनाशी व्यापक नाते जोडणारा असा वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप विस्तृत व सखोल आहे. कादंबरी सहसा गद्य कथात्मक साहित्य महाराष्ट्रात ११ व्या शतकात लीळाचरित्रांच्या रूपाने निर्माण झाले आहे. लीळाचरित्रामध्ये छोट्या-छोट्या कथा गुंफलेल्या असून म्हाईंभटांनी चक्रधरांची जीवनकथा सलग तीन विभागात वर्णन केलेली आहे. आजच्या कादंबरी वाङ्मयात प्रकाराची वैशिष्ट्ये आपणास लीळाचरित्रामध्ये दिसतात. कादंबरीचे स्वरूप, उद्दिष्ट्ये, तंत्र व मंत्र यांची खूप चर्चा झाली आहे. साहित्य व समाज लोकाभिमुखता, साहित्याचे प्रयोजन, साहित्य व राजकारण, साहित्य व तत्वज्ञान,

साहित्य व साहित्येतर कला इत्यादी वादांची जी रणधुमाळी माजली तो मुख्यत्वेकरून कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या क्षेत्रात निरनिराळ्या काळात लोकांच्या कादंबरीविषयीच्या अपेक्षा भिन्न-भिन्न आहेत. कादंबरीचे स्वरूप कसे असावे यासंबंधी अनेक लेखकांनी आपले विचार मांडले आहेत. तर काहींनी या वाङ्मयप्रकाराला जीवनाचा आरसा असे संबोधले आहे.

कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण निर्मिती, भाषाशैली, निवेदनपध्दती आदि घटक कादंबरीचे स्वरूप सिद्ध करतात.

**कथानक -**

हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. मौलिकता, संभवनीयता, रचनाकौशल्य इ. वैशिष्ट्ये असणारे कथानक म्हणजे सुविहित कथा असते. विकसित आणि स्वाभाविक कथानकात उपकथांबरोबरच अनेक घटनाही असतात. उत्कंठा, हुरहूर, विस्मय या त्रयींवर कथानकाचे आकर्षण अवलंबून असते. अर्थात याच तंत्र-पध्दतीनुसार कादंबरी-लेखन होते असे नाही. म्हणून हे निकष आज सर्वच कादंबऱ्यांना लावता येतील असे नाही.

**व्यक्तिचित्रण -**

घटना व्यक्तींमुळे घडतात. स्थिरप्रवृत्तीच्या किंवा विकसनशील व्यक्तिरेखा जिवंत आणि स्वाभाविक वाटतील याची दक्षता कादंबरीकाराने घेणे गरजेचे असते. कादंबरीकार जितका 'मी' पणा विसरेल तितके त्याचे व्यक्तिचित्रण यशस्वी होते. कल्पनाशक्ती आणि मनोव्यापारांची जाण असणारा कादंबरीकार जिवंत व्यक्तिचित्रण करू शकतो. ''स्वामी'' मधील ''माधवराव'', ''पण लक्षात कोण घेतो'' मधील ''यमू'', ''धग'' मधील ''कौतिक'' ही व्यक्तिचित्रणे या दृष्टीने चांगलीच उतरली आहेत. व्यक्तिचित्रणे करताना कादंबरीकार त्या व्यक्तिचित्रांशी त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांशी समरस झालेला असतो.

**वातावरणनिर्मिती -**

स्थल, काल वैशिष्ट्यांचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजे वातावरण होय. समाजजीवन मूल्यांचा संघर्ष, मानवी संबंधाचे दर्शन यांचा समावेश या शब्दात होतो. कथानकाला योग्य पार्श्वभूमीचे काम कादंबरीत वातावरणनिर्मितीने होते. कथानकाला योग्य पार्श्वभूमी लाभल्यास कथानक उठावदार होते. वातावरणातून कालदर्शन होते. प्रसंगी कालनिश्चितीही करता येते. ऐतिहासिक, पौराणिक कादंबरीसाठी वातावरणनिर्मितीची अत्यंत आवश्यकता असते. यामुळे व्यक्ती त्या काळात जाऊन त्या घटना प्रसंगांचा कथेचा आस्वाद घेते.

**भाषाशैली -**

कादंबरीची भाषा क्लिष्ट किंवा अलंकृत असण्यापेक्षा साधी, सोपी, सरळ असावी. कादंबरीच्या कथानकाला अनुसरून केलेली भाषेची रचना प्रभावी होते. उदा. ऐतिहासिक कथानक असेल तर ऐतिहासिक शब्दयोजना, वाक्यरचना इ. मनोविश्लेषणात्मक कादंबरीत मनातील उत्स्फूर्त विचार त्याच शब्दात प्रकट करण्याकडे असणारा लेखकाचा कल, पौराणिक कादंबरीत येणारी संस्कृतप्रचुर भाषा, इंगुदी, उत्तरीय यासारची शब्दयोजना पुराणकाळचा संदर्भ देते.

**निवेदनपध्दती -**

घटनेची पार्श्वभूमी सांगणे, क्रियाप्रतिक्रियांचे कथन करणे याामुळे कादंबरीत निवेदनाचे स्वातंत्र्य भरपूर असते. कादंबरीकार स्वत: कादंबरीत वेळोवेळी प्रकट होऊन सभोवतीचे वातावरण किंवा पात्रांविषयी निवेदन करतो. दृश्यमालेची क्रमाने मांडणी, पूर्वस्मृती आणि प्रत्यक्ष घटना घडत असलेला काळ यावर निवेदनपध्दती अवलंबून असते. जौळ, अमृतवेल या कादंबरीतील स्वमुखी, पात्रमुखी पध्दत 'इंदु काळे सरला भोळे' सारख्या कादंबरीत पात्र किंवा दैनंदिनी अशी आत्मनिवेदन पध्दती असते. हे निवेदन कधी भूतकाळाचा मागोवा घेते तर कधी व्यक्ती आणि परिसर जिवंत करते. निवेदनातून कादंबरीकार आपले

विचार प्रकट करतो. पात्रमुखी निवेदनपध्दतीमुळे आणि जीवनसंघर्षातील वेगवेगळे दृष्टिकोन दाखवल्यामुळे त्या घटनेसंबंधीच्या लेखकाच्या प्रतिक्रिया कळतात. परिणामी कथानक उद्‌बोधक वाटते. आत्मनिवेदनात्मक पध्दती स्वीकारून लेखक आपण पात्रांशी एकरूप झालो आहोत असे वाचकांना भासविण्याचा प्रयत्न करतो.

या घटकांबरोबरच संवाद,संघर्ष, कादंबरीकाराचा दृष्टिकोन यांनाही महत्त्व असते. पण कादंबरीत असणारे व्यक्ती आणि समाज यांचे सखोल आकलन आणि जीवनविषयक चिंतन हे कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराचे वेगळेपण आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी आशयानुरूप, अद्‌भूतरम्य, राजकीय, ऐतिहासिक, प्रणयरम्य, सामाजिक, पौराणिक असे कादंबरीचे वर्गीकरण केलेले आहे. व्यक्तिमत्वातील विचारांना महत्व देणारी संज्ञाप्रवाही कादंबरी हासुध्दा कादंबरीचाच प्रकार आहे.

**महाभारत आणि पौराणिक कादंबरी –**

''महाभारत हे सर्व अर्थानेच महान आहे. एक लक्ष श्लोकांची संहिता त्याचे महत्व स्पष्ट करते. तर त्यातील जीवनाचे विविधांगी दर्शन त्याचे विराटत्व सिद्‌ध करते. महाभारत हा जागतिक साहित्यातील मेरूमणी आहे. ''यात जे आहे ते अन्यत्र असण्याची शक्यता आहे पण यात जे नाही ते अन्यत्र कोठेही आढळणार नाही.'' ही व्यासोक्ती अतिशयोक्ती भासली तरी सार्थ आहे.''[२७] महाभारत हा मानवी जीवनाचे सूक्ष्म, व्यापक, सखोल व जिवंत दर्शन घडविणारा ग्रंथ आहे. या ग्रंथातील मानवी जीवनाच्या विशाल दर्शनामुळे समस्त मानव जातीला या ग्रंथाचे आकर्षण वाटणे स्वाभाविक आहे. या ग्रंथातील घटना, प्रसंग, व्यक्ती यांचे स्वभावविशेष गुणावगुण यशापयश हे सर्वच मानवी पातळीवर चित्रित झाल्यामुळे जगभरातील विचारवंतांचे लक्ष या ग्रंथाने खेचून घेतले. जगातील पन्नासहून अधिक भाषांत महाभारताचे अनुवाद प्रसिद्‌ध झालेले असून त्याची थोरवी तसूभरही कमी झालेली दिसत नाही. महाभारतातील व्यक्ती या महान असल्या तरी त्या निर्दोष नाहीत.

सामान्य माणसांसारखे गुणावगुण त्यांच्याठायी असलेले जाणवतात. त्यामुळेच या व्यक्तिरेखा मानवी वाटतात. सदर महाकाव्यात व्यासांनी मानवी भावभावनांचा जो असामान्य अविष्कार घडविला आहे त्याला जगातील इतर कोणत्याही महाकाव्यात तुलना सापडत नाही.

श्री.र.भिडे लिहतात, ''पती अंध आहे एवढ्याच कारणास्तव उभा जन्म डोळ्यावर पट्टी बांधून कृत्रिम अंधत्वाचा स्वीकार करणारी गांधारी, परागंदा पतीच्या शोधार्थ 'अलिक स्वयंवराचा' अभूतपूर्व मार्ग चोखाळणारी दमयंती, नियोजीत पती अल्पायुषी असल्याची विवाहापूर्वी कल्पना असूनही एकदा ज्याला मनाने वरले त्याच्याच गळ्यात वरमाला घालणारी निग्रही सावित्री ज्या ग्रंथात आहेत त्याच ग्रंथात अनावर कामवासनेच्या तृप्तीसाठी धडपडणाऱ्या उलूपी, हिडींबा, उर्वशीही आहेत. शुक्रासारखा उग्र वैरागी आणि भीष्मासारखा नैष्ठिक ब्रह्मचारी ह्यांच्या जोडीने इंद्र, शंतनू, ययातीसारखे विषयलंपट, एका स्त्रीच्या द्रौपदीच्या विटंबनेचा बदला घेण्यासाठी दंड थोपटून आव्हान देणारे भीम, अर्जुन, श्रीकृष्ण, पुत्रासाठी नियोगाचा अवलंब करणाऱ्या कुंती, माद्री, अंबिका, अंबालिका तर पुत्राचा बळी देऊ पाहणारा विश्वामित्र, वंशवृध्दीसाठी स्वभार्येला वसिष्टाकडे धाडणारा सौदास राजा, मातेचा शिरच्छेद करण्यास सांगणारा जमदग्नी असे विविध नमुने महाभारतात पहावयास मिळतात, पुरूषांच्या बहुपत्नीत्वाला आव्हान देणारी द्रौपदी, वाग्दत्त वधूला आपले अर्धे आयुष्य अर्पण करणारा रूरू, स्त्रीचा वारा सुध्दा नको म्हणून वनवास पत्करणारे ऋषी, वस्त्रहरणात आनंद मानणारे कर्ण, दु:शासन, दासीची अभिलाषा करणारा कीचक, भरसभेत एका स्त्रीला मांडी उघडी करून दाखविणारा दुर्योधन, वखवखलेल्या नजरेने गंगेचे अनावृत्त शरीर पिऊ पाहणारा महाभिष, जयद्रथ, धृतराष्ट्र, संजय द्रौण, विदूर किती म्हणून नावे घ्यावी?''[२८] आपल्या स्वार्थासाठी पुत्राचे तारूण्य हिरावून घेणारा ययाति, त्याचप्रमाणे प्रतिष्ठेसाठी आपल्या मुलीला दानात अर्पण करणारा ययाति, २०० अश्वांच्या

बदल्यात एक पुत्र असा माधवीचा तीन राजांशी विनिमय करणारा गालव मुनी, २०० अश्वांच्या बदल्यात माधवीचा स्वीकार करणारे विश्वामित्र अशी अनेक पात्रे आपणाला महाभारतात पहावयास मिळतात. या सर्व व्यक्तिरेखा त्यांचे स्वभाव, गुणदोष, समाजजीवन, राजकीय स्थित्यंतरे, स्त्री-पुरूष संबंध इत्यादी गोष्टी पौराणिक कादंबरीच्या माध्यमातून समाजासमोर आणण्याचा प्रयत्न लेखक करताना दिसतात. त्या कादंबऱ्या वाचून वाचकांना महाभारतातील व्यक्तींविषयी आकर्षण वाटू लागले आहे. महाभारतातील व्यक्तींनी पिढ्यानूपिढ्या आपल्या अंत:करणाचा ठाव घेतलेला आहे. महाभारत केवळ कल्पित पुराणकथा न मानता ते समष्टीचे-समाजाचे महाकाव्य झाले आहे. समूहमनाचा आविष्कार असलेली ही सांस्कृतिक पुराणकथा आता बनली आहे. महाभारतातील व्यक्ती स्थूल स्वरूपात का होईना पण ज्ञात नाही अशी मराठी माणसे शोधूनही सापडत नाहीत. आपल्या दैनंदिन जीवनात आणि व्यवहारातही महाभारतातील व्यक्तींना कायमचे स्थान प्रतिक म्हणून का होईना पण निश्चित लाभले आहे. या व्यक्तींनी आपण भारावून गेलेलो आहोत म्हणून बुध्दिनिष्ठ इंद्रियगम्य चिकित्सा येथे फारशी महत्वाची व उपयुक्त ठरत नाही. या व्यक्तींच्या जीवनातील अद्‌भूत आणि भयानक संभवनीय करण्याच्या प्रयत्नातूनही फारसे साधत नाही. मराठी प्रतिभावंतांनी महाभारतातील व्यक्तींची केलेली चित्रणे म्हणजे या साहित्यिकांच्या प्रतिभेचा विलास आहे.

पौराणिक कादंबरीलेखनात व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न प्रामुख्याने दिसतो. काही वेळेला एकाकी व्यक्ती हाही लेखनाचा विषय होतो. रेणू देशपांडे यांची 'सम्राज्ञी' (१९७७) ही कादंबरी महाभारतातील चिरतरूण द्रौपदीची कहाणी सांगणारी आहे. इतर लेखकांनीही द्रौपदीवर आधारीत कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्याचप्रमाणे कर्ण, माधवी, गांधारी, ययाति, भीष्म, दुर्योधन, सावित्री, कुंती, कृष्ण, युधिष्ठिर अशा अनेक ठळक व्यक्तिरेखा घेऊन कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. या कादंबऱ्या वाचत असताना जुन्या

कहाण्या नव्याने वाचत आहोत याची अनुभूती वाचकाला येते. सहज, सुंदर, काव्यमय भाषा, उत्कृष्ट कल्पनाविलास व कथानकांतून, संवादातून वेळोवेळी प्रगट झालेले प्रगल्भविचार कादंबरीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतात. अशाप्रकारे 'पौराणिक कादंबरी' या साहित्यप्रकारात अनेक लेखकांनी रस घेतलेला दिसतो. एकेक व्यक्तिरेखा रेखाटताना भरपूर अभ्यास करून वेगवेगळ्या दृष्टिकोनातून त्याकडे पाहिलेले आहे. पौराणिक कादंबरीमध्ये विभूतीपूजन, उत्कट पूज्यभाव जसा दिसून येतो तसेच उपेक्षित, दुर्लक्षित राहिलेल्या व्यक्तींना प्रकाशात आणणे ही भावनादेखील असते.

**पौराणिक कादंबरीची वाटचाल -**

कादंबरीच्या माध्यमातून मानवी जीवनाचा आलेख मांडला जातो. अनेक कादंबऱ्यातील स्त्री-जीवनाच्या नानाविध यातनांचे, पुरूषप्रधान समाजातील, एकत्र कुटुंबातील दास्यांचे, नैतिक मूल्यांच्या व परंपरांच्या आधारे तिच्या निर्घृण शोषणाचे करूण चित्र अनेक कादंबरीकारांनी रेखाटलेले दिसून येते. सामाजिक सुधारणा व भारतीय स्वातंत्र्य या दोन ज्वलंत विषयांभोवती १९ व्या शतकाच्या पूर्वाधातील मराठी कादंबरी अधिक रमल्यामुळे पौराणिक कादंबरीविषयी पुरेशी तात्विक चर्चा झालेली नसली तरी जेवढी चर्चा झालेली आहे. तिचा परामर्श घेऊन काही निष्कर्ष काढणे योग्य ठरेल. यासंदर्भात भालचंद्र नेमाडे, चंद्रकांत बांदिवडेकर इ. काही समीक्षकांनी केलेली चर्चा मार्गदर्शक व उपयुक्त वाटते. चंद्रकांत पाटील यांनी घेतलेल्या मुलाखतीत भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''देशोदेशीच्या लोककथा, परीकथा, भयकथाही वारंवार वाचणं मला आवडतं पण तरीही रामायण, महाभारताची सर नाही.''[२९] भालचंद्र नेमाडे यांच्या या विधानांतून रामायण, महाभारत या महाकाव्यांची आवाहकताच अधोरेखीत होते. म्हणूनच या कथानकांवर अनेक साहित्यकृती लिहिल्या गेल्या. मराठीतील पौराणिक नाटके व कादंबऱ्यांची संख्या विचारात घेता नेमाडे यांचे वरील मत लक्षणीय वाटते.

यासंदर्भात चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात, ''भारतीय लेखकाचे महत्भाग्य असे की, त्याच्याकडे पौराणिक कथांचे भांडार प्रचंड, महाभारत, रामायण, पुराणकथा, जातककथा, पंचतंत्रकथा इत्यादींनी लेखकाचे मन संस्कारित व्हायला केवढी तरी संधी, लोकसाहित्याची केवढी तरी सोन्याची खाण आजही बहुजनसमाज माणसांत लपलेली आहे. पण शिक्षित समाजाने याकडे पाठ फिरवलेली दिसते.''[३०] पुढे ते लिहितात, ''मराठी नाटकात पौराणिक नाटकांची निर्मिती संख्या व गुणवत्ता दोन्ही दृष्टींनी समाधानी असली तरी कादंबरीला फारसे प्रोत्साहन पौराणिक कथांनी दिले नाही. यावरून असे दिसते की, पौराणिक कादंबरीची विस्तृत तात्विक चर्चा न होण्याचे हेही एक कारण असू शकेल.''[३१]

'पुरा अपि नवम् तत् पुराणम' असे संस्कृतमध्ये एक वचन असून सदैव ताजे व टवटवीत असते ते पुराण असा त्याचा अर्थ होतो. पुराण्या म्हणजे जुन्या काळापासून चालत आलेल्या कथा असाही पुराणकथेचा अर्थ काढता येईल. शतकानुशतकांचे समाजव्यवस्थेतील अस्तित्व हा पुराण कथांचा विशेष होय. पौराणिक कादंबरीला ऐतिहासिक कादंबरीचाच एक उपविभाग मानले जाते. ऐतिहासिक कादंबरीचे पौराणिक कादंबरीशी जवळचे नाते असले तरी दोन्हींच्या स्वरूपात भिन्नता जाणवते. उपलब्ध साधनसामुग्रीच्या बळावर ऐतिहासिक कादंबरी उभी असते, तर पौराणिक कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाला तत्कालीन समाजवास्तवात डोकावण्यासाठी कल्पनेचा आधार घ्यावा लागतो. पौराणिक कादंबरी ही अलौकिकता, अद्‌भूतता आणि वास्तवाच्या आभासाला मोठ्या प्रमाणात आहारी जाते. शोधापेक्षा रंजकतेला दिलेले महत्व व परंपरेच्या उदात्तीकरणाचा ललित लेखकांनी स्वीकारलेला शिरस्ता तिच्या मर्यादा सीमित करताना दिसतो. कालदृष्ट्या जुने पण परिणामी नवे स्वरूप धारण करणारे पुराण हे रसिकमान्य आहे. त्यामुळेच वर्तमानाच्या समस्यांचे आशयसूत्र घेऊन पौराणिक लेखन विपुल प्रमाणात

झालेले दिसते. ज्ञात इतिहासाच्याही पूर्वीच्या युगाचे दर्शन पौराणिक कादंबरी वाचकांना घडविते, परंतु खऱ्या अर्थाने मराठी कादंबरी वाङ्मयात पौराणिक कादंबरीला स्थान १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मिळाले. आजच्या जीवनातील परिस्थिती व समस्या यांची उत्तरे देण्यासाठी पौराणिक कथावस्तुंचा उपयोग करणे हा एक पौराणिक कादंबऱ्यांचा प्रमुख उद्देश आहे.

प्र.वा.बापट आणि ना.वा.गोडबोले यांच्या मते, ''कथेतील घटनांच्या वास्तवतेसंबंधी मतभेदाला पौराणिक कादंबरीत विशेष वाव नसल्याने घटनांच्या निवेदनपद्धतीला, अन्वयार्थाला व व्यक्तिरेखनाला साहजिकच महत्व अधिक येते.''[३२]

मुख्यत्वेकरून भारतात आणि मराठी समाजमनामध्ये पुराणप्रियता अधिक आहे. पुराणांमधून व्यक्त होणाऱ्या मानवी जीवनाला नवीन अर्थ देऊन त्यातील जीवनमूल्यांचे चित्रण करण्याचे कार्य पौराणिक कादंबरी करते. भूतकाळातील संस्कृतीच्या आद्यतम काळात जन्मलेल्या या कथांचे उगमस्थान अज्ञातच असते. पौराणिक काळापासून या कथांचा प्रभाव जनमाणसांवर असला तरी याविषयीची चिकित्सा मात्र अलिकडच्या काळातील आहे. पौराणिक व्यक्तिसंबंधीचे पुरावे समाजमनात दृढ असल्यामुळे त्याचे भान ठेवूनच बहुतांशी कादंबरी लेखन झालेले दिसते.

वसंत आबाजी डहाके लिहितात, ''रंजक पध्दतीने पौराणिक कथा सांगणे, पौराणिक व्यक्तींचे पूनर्मूल्यमापन करणे, आधुनिक जीवनातील प्रश्नांचा वेध घेण्यासाठी पौराणिक व्यक्तींचा आणि कथांचा अवलंब करणे, आधुनिक काळातील विचार अथवा दृष्टिकोन पौराणिक व्यक्तींच्या व त्यांच्या वर्तनांच्या चित्रणातून व्यक्त करणे, परंपरेने चालत आलेली नैतिक भूमिका ठसवणे असे विविध उद्देश या लेखनामागे दिसतात. मात्र एखाद्या पुराणकथेचा वेध घेऊन मानवी व्यवहारावर आणि विचारावर प्रकाश टाकणे अथवा कथागत व्यक्तींचा काळ व त्याकाळातील वास्तव तपशिलाने उभे करणे यांकडे लेखकांचे लक्ष

गेलेले दिसत नाही.''[३३] मराठीतील बहुतांशी पौराणिक कादंबरी ही वर्तमान संदर्भापासून दूर गेलेली असून चरित्रनायकाचे उदात्तीकरण करण्यात रमलेली दिसतात. त्यामुळेच ''आधुनिक भाषेत सांगितलेली पुराणकथा''[३४] हे अविनाश सप्रे यांचे प्रदक्षिणेतील मत लक्षणीच वाटते.

मराठीतील पौराणिक कादंबऱ्या मुख्यत: व्यक्तिप्रधान आहेत. नवीन प्रवाहाचा हा नवाच आविष्कार होय. स्त्रियांनी लिहिलेल्या पौराणिक कादंबरीलेखनात देखील ही व्यक्तिप्रधानता आहेच. मराठी कादंबरीच्या क्षेत्रात हा जो पौराणिकतेचा मार्ग स्वीकारला गेला त्यामध्ये सुमती क्षेत्रमाडे, अरूणा ढेरे, सरोजनी शारंगपाणी, आशा बगे, शुभांगी भडभडे, सुमती इनामदार, शैला बेल्ले, रेखा बैजल, लीला दीक्षित इ. नी लेखन केले. योगेश्वर श्रीकृष्ण, नलदमयंती, मैत्रेयी, उर्वशी, द्रौपदी, गांधारी, परशुराम, दुष्यंत, शकुंतला इ. व्यक्ती या पौराणिक कादंबऱ्यांचा विषय झाल्या.

पौराणिक अन्वयार्थ शोधताना ल.ग.जोग लिहितात, ''साध्या भाकडकथा म्हणून पुराणाकडे पाहणारे वाचक, पुराणे ही वेदाइतकी अक्षरश: सत्य मानणारे जुने पुराणिक, आपल्या अन्य आशयासाठी कथांचा उपयोग करणारे रूपकथाकार व संपूर्णपणे तोच आशय वेगळ्याच दृष्टिकोनातून पाहणारे लेखक अशा चार प्रकारांनी ह्या पुराणकथांचा अन्वयार्थ लागू शकतो.''[३५]

पौराणिक विषयावरती सुरूवातीला काही कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्यामध्ये श्री. प्रभाकर यांची 'सत्यवान-सावित्री' (१९११) पुराणातील वटसावित्री कथा या कादंबरीचा गाभा आहे. ना.के.बेहरे यांची 'सीता वनवास' (१९१२) व अहिल्योध्दार (१९२९) या रामयणावर आधारीत कादंबऱ्या आहेत. वा.म.जोशी यांची 'आश्रमहरिणी' (१९१५) या कादंबरीला आख्यान कथेची बैठक असून व्दिभार्या या सामाजिक समस्येची उकल या कादंबरीत केली आहे. श्री.म.वर्दे यांची 'कलंक रहस्य' (१९२९) कच संजीवनी विद्या

मिळविण्यासाठी शुक्राचार्यांकडे येतो. शुक्राचार्यांचा शिष्य बनून तो गुरूच्या पोटात विद्या ग्रहण करतो. पुराणकथेचा नवा अर्थ विषद करण्याऐवजी पुराणकथेच्या आश्रयाने अद्‌भूतता, काल्पनिकतेला कवटाळणारी ही कादंबरी वाटते. साने गुरूजी यांच्या 'आस्तिक' (१९४९) या कादंबरीत हिंदु-मुस्लिम दंग्याचे कथासूत्र रूपकात्मक स्वरूपात मांडले आहे. वि.स.खांडेकर यांची 'क्रौंचवध' (१९४२), माडखोलकर यांची प्रमव्दरा (१९४६) या इ.स. १९५० पूर्वी लिहलेल्या पौराणिक कादंबऱ्या होत. या सर्व कादंबऱ्या म्हणजेच नव्या कथांवर जुन्या कथांचे मुखवटे होय.

इ.स. १९५० नंतर ही स्थिती बदलताना दिसते. आपल्या मूळांचा शोध घेण्याची इच्छा जोरदार झाली असल्याचे जाणवते. जुन्या सोन्याच्या खाणींचा शोध घेऊन त्या सोन्यापासून नवे अलंकार बनविण्याची धडपड वाढीला लागलेली दिसते. जुन्या कथांवर नवे मुखवटे चढविण्याकडे भर दिला जाऊ लागला. वि.स.खांडेकरांनी इ.स. १९५९ मध्ये 'ययाति' ही कादंबरी लिहून या नव्या प्रवृत्तीला जन्म दिला. या कादंबरीला भरपूर यश लाभल्यामुळे पौराणिक विषयाकडे अनेक लेखकांचे लक्ष वेधले गेले. त्यानंतर गो.नी.दांडेकर यांची 'कर्णायन' (१९६२) ही कर्णावर आधारीत कादंबरी आहे व दुसरी कादंबरी 'अजून नाही जागे गोकुळ' (१९६३) ही कादंबरी आहे. शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' (१९६९), आनंद साधले यांची 'महापुरूष' (१९६९), भा.द.खेर यांनी 'कल्पवृक्ष' (१९७५) व 'सारथी सर्वांचा' (१९७६) या श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारीत कादंबऱ्या लिहिल्या. रेणू देशपांडे यांची सम्राज्ञी (१९७७) द्रौपदीच्या जीवनावर आधारीत कादंबरी आहे. लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'अंबा' (१९७९) काशीराजाची कन्या अंबा हिच्या जीवनावर आधारीत आहे. अनंत तिबले यांची 'गौतमी' (१९८२) ही कृपीच्या जीवनावर आधारीत आहे. रणजित देसाई यांची 'राधेय' (१९८३) कर्णाच्या जीवनावर आधारित आहे. डॉ. म.वि.गोखले यांनी 'सत्यप्रतिज्ञा' (१९८३) व 'महाभारतातील महामानव भीष्म' (१९९८) या भीष्मावर

आधारीत कादंबऱ्या लिहिल्या. वि.शं.पारगावकर यांची 'अयोनिजा' (१९८४) द्रौपदीवर आधारीत. शरद दळवी यांची 'एकलव्य' (१९८८) एकलव्यावर आधारीत आहे. एस.एल.भैरप्पा - 'पर्व' (१९९१), लीला दीक्षित यांची 'स्वामी अपरान्ताचा' (१९९३) परशुरामावर आधारीत आहे. विजया जहागिरदार यांची 'ययातिकन्या माधवी' (१९९३), ययातीची कन्या माधवीवर आधारीत कृ.पं.देशपांडे यांची 'अग्नीशिखा' (१९९४) अंबावर आधारीत आहे. अनंत अंबादास कुलकर्णी यांची 'कुंती ... मी राजमाता' (१९९४) ही कुंतीवर आधारीत कादंबरी आहे. अनिरूद्ध यांची 'सुयोधन' (१९९४) व काका विधाते यांची 'दुर्योधन' (१९९४) ह्या दुर्योधन या व्यक्तिरेखेवर लिहिलेल्या कादंबऱ्या आहेत. सरोजनी शारंगपाणी यांची 'गांधारी' (१९९६) गांधारीवर आधारीत व कुंतीवर आधारीत 'कुंती' (१९९८) या दोन कादंबऱ्या लिहिल्या. शिवाजी सावंत यांची 'युगंधर' (२०००) कृष्णावर आधारीत, राजेन्द्र खेर यांची गीतांबरी (२०००) भगवद्‌गीतेवर आधारीत, विनोद गायकवाड यांची 'युगांत' (२००१) व रवींद्र शोभणे यांची 'उत्तरायण' (२००१) भीष्मावर आधारीत कादंबऱ्या आहेत. प्रफुल्लता जाधव यांची 'गोकुली'(२००१) राधेवर आधारीत तर सुधाकर शुक्ल यांची 'गांगेय' (२००३) भीष्मावर आधारीत आहे. प्रा. रवींद्र ठाकूर यांची 'धर्मयुद्ध' (२००३) कर्णावर आधारीत, अनंत मनोहर यांची 'ज्येष्ठ' (२००५) युधिष्ठिरावर आधारीत, सुरेश व्दादशीवार यांची 'राजधर्म' (२००५) कृष्णावर आधारीत, राजीव पुरषोत्तम यांची 'वैदिक' (२००५) ही ऋचिक, जमदग्नी, परशुराम या तीन व्यक्तिरेखेभोवती फिरणारी कादंबरी आहे. राजेन्द्र खेर यांची 'धनंजय' (२००५) अर्जुनावर आधारीत, प्रभाकर बागुल यांची 'गांगेय' (२००६) भीष्मावर आधारीत, भा.द.खेर यांची 'शापीत धर्मात्मा विदूर' (२००६) विदुराच्या जीवनावर आधारीत व संध्या देशपांडे यांची 'अश्वदा' (२००६) ही ययातिकन्या माधवी हिच्या जीवनावर आधारीत कादंबरी आहे. अशाप्रकारे पौराणिक विषयावरती, पुराणातील व्यक्तिरेखेवर आधारीत अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण १ ले

## संदर्भसूची

१) मुखर्जी मीनाक्षी,
तौलनिक साहित्याभ्यास : तत्वे आणि दिशा,
संपादक - चंद्रशेखर जहागीरदार,
सौरभ प्रकाशन, कोल्हापूर,
आावृत्ती पहिली,
१९९२, पृ.क्र.२४२.

२) अत्रे (आचार्य) प्र.के.,
मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी सानेगुरूजी,
साधना प्रकाशन, पुणे, ४११ ०३०,
प्रकाशनदिन,
२४ डिसेंबर १९७३.

३) नायर एस.गुप्तन,
कठडा (प्रस्तावना),
नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली,
आवृत्ती पहिली,
१९९३.

४) देशपांडे कुसुमावती,
मराठी कादंबरीचे पहिले शतक,
मुंबई मराठी साहित्य संघ,
आवृत्ती दुसरी,
१९७५, पृ.क्र. १५.

५) नेमाडे भालचंद्र,
टीकास्वयंवर,
साकेत प्रकाशन, औरंगाबाद,
आवृत्ती पहिली,
१९९०, पृ.क्र.१९६.

६) मुखर्जी मीनाक्षी,
तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा,
उनि, पृ.क्र.१९६.

७) हस्तक उषा,
कादंबरी आणि मराठी कादंबरी,
साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद,
आवृत्ती पहिली,
१९९३, पृ.क्र.२२७.

८) जाधव रा.ग.
मराठी विश्वकोश खंड - ३,
संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी,
म.रा.सा.सं, मंडळ, मुंबई,
आवृत्ती पहिली,
पृ.क्र.६००.

९) देशपांडे कुसुमावती,
मराठी कादंबरीचे पहिले शतक,
उनि, पृ.क्र.१६.

१०) बापट प्र.वा., गोडबोले ना.वा.,
मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास,
व्हीनस प्रकाशन पुणे ४११ ०३०,
तिसरी आवृत्ती,
पृ.क्र. ५.

११) संत (प्रा.) जान्हवी,
कादंबरी एक वाङ्मय प्रकार
मोघे प्रकाशन, कोल्हापूर - २,
प्रथम आवृत्ती १९७१ पृ.क्र. १३

१२) तत्रैव पृ.क्र. ९

१३) बापट प्र.वा., गोडबोले ना.वा.
मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास,
उनि पृ. ३७.

१४) संत (प्रा) जान्हवी,
कादंबरी एक वाङ्मय प्रकार,
उनि पृ. १०.

१५) कुलकर्णी विठ्ठल हरी,
अर्वाचीन मराठी साहित्य
(१८७५-१९३५)
पृ.क्र.७२.

१६) हस्तक उषा,
कादंबरी आणि मराठी कादंबरी,
उनि, पृ.क्र.११३.

१७) हातकणंगलेकर म.ना.,
प्रदक्षिणा,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
पुणे - ३०,
पृ.क्र.१७४.

१८) कुरूंदकर नरहर,
धार आणि काठ,
देशमुख आणि कंपनी, पुणे,
आवृत्ती चौथी १९९८,
पृ.क्र.४४.

१९) कुलकर्णी वा.ल,
साहित्य : शोध आणि बोध,
पॉप्युलर प्रकाशन मुंबई,
दुसरी आवृत्ती १९९५,
पृ.क्र. ९६-९७

२०) बांदिवडेकर चंद्रकांत,
मराठी कादंबरीचा इतिहास,
मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे - ३०,
पहिली आवृत्ती १९८९,
पृ.३१.

२१) त्रिवेदी विष्णूप्रसाद,
(लेख वाड्मयेइतिहासाची मीमांसा),
अनुवाद - मेधा सिधये,
आलोचना जानेवारी १९८६,
पृ.क्र.२.

२२) कुलकर्णी वा.ल.,
हस्तक उषा,
मराठी वाड्मयाचा इतिहास,
खंड पाचवा, भाग पहिला,
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे,
आवृत्ती पहिली १९७३,
पृ.क्र.९

२३) कुलकर्णी गो.म.,
महाराष्ट्र साहित्य पत्रिका,
जुलै - डिसेंबर १९८०,
पृ.क्र.९

२४) देशपांडे कुसुमावती,
मराठी कादंबरीचे पहिले शतक,
मराठी साहित्य संघ, मुंबई,
चौथी आवृत्ती १९७५,
पृ.क्र. ३२.

२५) कुलकर्णी श्री.मा.
कादंबरीची रचना
उन्मेश प्रकाशन,
आवृत्ती १९५६,
पृ.क्र.१५

२६) बापट, प्र.वा, गोडबोले ना.वा.
मराठी कादंबरी तंत्र आणि विकास
व्हीनस प्रकाशन पुणे,
दुसरी आवृत्ती १९७५,
पृ.क्र.३३

२७) भिडे श्री. र.
महाभारताचे वरदान,
राजहंस प्रकाशन पुणे,
खंड - एक,
पृ.क्र.११.

२८) भिडे श्री. र.
महाभारताची शापवाणी,
प्रकाशक-भिडे शां.श्री.,
कोथरूड पूणे,
पृष्ठ क्र. २.

२९) नेमाडे भालचंद्र,
टिकास्वयंवर,
साकेत प्रकाशन औरंगाबाद,
आवृत्ती पहिली १९९०,
पृ.क्र. २७१.

३०) बांदिवडेकर चंद्रकांत,
मराठी कादंबरीचा इतिहास,
उनि, पृ.क्र. १११.

३१) तत्रैव, पृ.क्र.११२

३२) बापट प्र.वा. आणि गोडबोले ना.वा.,
मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास,
उनि, पृ.क्र.१७२.

३३) डहाके वसंत आबाजी,
गेल्या अर्धशतकातील पौ. व ऐ. लेखनाची फलश्रृती व कादंबरी,
संपादक - विलास खोले,
लोकवाङ्मय गृह मुंबई,
आवृत्ती पहिली २००२,
पृ.क्र.११२.

३४) सप्रे अविनाश,
स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी प्रवृत्ती आणि प्रवाह,
प्रदक्षिणा खंड दुसरा,
संपादक - अ.अ.कुलकर्णी,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,
तिसरे पुनर्मुद्रण, २०००,
पृ.क्र. १९९.

३५) जोग ल.ग.,
कादंबरी,
जोग - लोखंडे ग्रंथ प्रकाशन, पुणे,
आवृत्ती पहिली, १९९३,
पृ.क्र.१३१.